# फुल कव्हरेज मास्क

आजच्या ट्यूटोरियलमध्ये आपण फुल कव्हरेज मास्क शिवायला शिकणार आहोत.





## लागणारे साहित्य

मास्क साठी आवश्यक असलेले साहित्य :-
11 इंच रुंद आणि 6 इंच लांबीचा कमी वजनाचा कॉटनचा कपडा
अस्तरासाठी 11 इंच रुंद आणि 6 इंच लांबीचा आणखीन एक कपडा.
मास्क चे टेम्प्लेट
मार्कर
पिना
मॅचिंग दोरा
साडे दहा इंच लांबीचे इलास्टिकचे दोन तुकडे




सुरुवातीला आपण मास्क शिवण्यासाठी घेतलेले कापड टेबल वर पसरवून घेऊ. कॅमेऱ्यात दिसणारी कपड्याची प्रिंटेड बाजू ही सुलट बाजू आहे तर त्याच्याविरुद्धची उलट बाजू आहे. सध्या आपण कपड्याच्या उलट बाजू वर काम करणार आहोत. फुल कव्हरेज मास्क साठीचे टेम्पलेट आमच्या www.ushasew.com या वेबसाइटवरून डाऊनलोड करून घ्या. हे टेम्प्लेट कपड्यावर पसरवून टेम्प्लेट प्रमाणे कपड्यावर मार्करने खुणा करून घ्या. आता कपड्यावरून टेम्प्लेट बाजूला करा. मार्करने केलेल्या आराखड्यानुसार कात्रीने कपडा कातरून घ्या. कपडा कातरताना त्यावरच्या खुणावरून अचूकपणे कात्रा म्हणजे तुमचा मास्क आकर्षक दिसेल. टेम्प्लेटप्रमाणे कातरून घेतलेला कपडा असा दिसेल.













मास्कला आतल्या बाजूने लावणार असलेले अस्तरही याच प्रमाणे टेम्प्लेटच्या आकारात कातरून घ्या. ट्यूटोरियलमध्ये दाखवल्याप्रमाणे पहिला टप्पा आपण पूर्ण केला आहे. मास्क आणि अस्तरचा कपडा टेम्प्लेटप्रमाणे अचूक कातरणं गरजेचं आहे हे लक्षात ठेवा. मास्क शिवण्यासाठी आपण उषा शिलाई मशीन वापरणार आहोत. शिवण्यासाठी आपण सरळ टिप वापरणार आहोत, म्हणुन मशीनचा पॅटर्न सिलेक्टर डायल A वर ठेवावा, स्टिच लेंथ 2.5 ठेवा आणि थ्रेड टेन्शन 4 ठेवा. मशीन सेट करून झाली की, व्हीडीओमध्ये दाखवल्याप्रमाणे अस्तराचा कपडा घेऊन त्याची मध्यात घडी घाला आणि या घडीच्या थोडेसे वरच्या बाजूला कपड्याच्या वरच्या कोपऱ्यावर टीप मारा. रिव्हर्स स्टिच सिलेक्टर वापरून उलटी टीप मारायला विसरू नका. कपड्याचा खालच्या कोपऱ्यांवर ही अशाच टिपा मारून घ्या. टीप मारताना सुरुवातीला आणि शेवटी उलटी टीप अत्यंत महत्त्वाची आहे कारण असं केलं नाही तर शिवणाचे टाके उसवतील हे लक्षात घ्या. आता आपण मास्कच्या मुख्य कापडाची सुलट बाजू सुलट बाजूवर येईल अशी मध्यावर घडी घालून घेऊ. अस्तराचा कपड्या प्रमाणे खालच्या आणि वरच्या कोपऱ्यांमध्ये या कपड्यावरही टिपा मारून घेऊ. दोरे कातरून पुढच्या टप्प्याकडे वळू.











तुम्ही मारलेल्या टिपा आशा दिसतील.  आता कपड्याची घडी उघडा आणि इथे दाखवल्याप्रमाणे अस्तराचा कपडा आणि मास्कचा कपडा यांच्या सुलट बाजू एकमेकांवर पसरवून घ्या. अस्तर आणि मास्कच्या कपड्यावर याआधी मारलेल्या वरच्या बाजूच्या टीपा एकमेकांना जुळवून पिन लावून घ्या. याचप्रमाणे खालच्या टीपाही एकमेकांना जुळवून पिन लावून घ्या.

आता आपण इथे दाखवल्याप्रमाणे कपड्याच्या वरच्या आणि बाजूच्या कडा मशीनवर शिवणार  आहोत. कपडा मशीनच्या प्रेसर फुट खाली असा ठेवा कि प्रेसर फुट आणि मास्कची वरची बाजू एका रेघेत येतील. आता शिवणाला सुरुवात करा आणि शिवत दुसऱ्या टोकावर जा. कपड्याचा कोपरा शिवताना मशीनची सुई कपड्यातच रोवलेली असु द्या आणि कपडा वळवून शिवण पुढे न्या, म्हणजे तुम्हाला कपड्यावर सलग टीप मारता येईल. कपड्याच्या प्रत्येक कोपऱ्यावर शिवताना याच प्रमाणे कपड्यात सुई रोवलेली ठेवून कपडा वळवून शिवण पुढे न्या म्हणजे तुम्हाला एका सलग शिवणात मास्क शिवता येईल. तुम्ही टीप जिथे सुरू केली होती तिथे पोहोचण्यापूर्वी दोन इंच अगोदरच टिप थांबवा. थोडे उलट टाके घेऊन लॉक करायला विसरू नका.  आपण हा गॅप का ठेवला आहे, हे तुम्हाला थोड्याच वेळात समजेल. थ्रेड कटरने दोरा कातरून टाका.




आता आपण जो दोन इंचाचा गॅप सोडला होता त्यामधून कपड्याची आतली बाजू बाहेर काढा.  बोटाच्या साह्याने कपड्याचा प्रत्येक कोपरा बाहेर खेचून घ्या. एकदा पूर्ण कपडा उलट झाला की तुमचा मास्क असा दिसू लागेल आणि तो जवळपास तयार झालेला असेल.

मास्कला पूर्ण फिनिशिंग  देण्यासाठी आपण गॅप सोडलेली जागा आणि पूर्ण मास्कवर टीप मारून घेणार आहोत. मास्कची कडा प्रेसर फुटच्या खाली एका रेषेत येईल अशी ठेवा आणि टीप मारायला सुरुवात करा. मास्कच्या चारही काठावरून टिप मारा. मशीनचा पॅटर्न सिलेक्टर डायल A वर आणि स्टिच लेंथ 2.5 ठेवायला विसरू नका. दोरे कातरून टाका. आता पुढचा टप्पा असेल मास्कला इअर लुप जोडणे.









इलास्टिकचा साडे दहा इंच लांबीचा एक तुकडा घ्या. त्याला मध्यभागी घडी घालून त्याची दोन्ही टोक साधारण अर्धा इंच एकमेकावर ओव्हरलॅप होतील असे ठेवून त्यावर टिपा मारून घ्या. या शिवणाला लॉक करायला विसरू नका म्हणजे टीप उसवणार नाही. याचप्रमाणे इलास्टिकचा दुसरा तुकडाही शिवून घ्या.  आता तुम्ही इलास्टिक लुप मास्कला जोडणार आहात. प्रथम एक इलास्टीकचा तुकडा मास्कच्या उलट बाजूच्या उभ्या बाजू वर ठेवा. मास्कचा पाव इंच काठ आतल्या बाजूला वळवून ईलास्टीकचा तुकडा आत राहील असा शिवून घ्या. याच प्रकारे इलास्टीकचा दुसरा तुकडा दुसऱ्या काठावर जोडून शिवून घ्या. आपले इयर लुप जोडून झालेले आहेत. अनावश्यक दोरे कातरून टाका आणि हा घ्या तुमचा मास्क तयार आहे. हा तयार झाला तुमचा फुल कव्हरेज मास्क . आहे ना शिवायला सोपा! तुम्ही वेगवेगळ्या रंगाचे कापड किंवा तुमच्या कपड्याला मॅच होणारे कापड वापरून घरच्या घरी अनेक मास्क शिवू शकता. घराबाहेर पडताना तुम्ही वापरत असलेला मास्क तुमचे नाक आणि तोंड पूर्णपणे झाकेल याची खात्री करून घ्या

